दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित


● वर्ष १७ वे ● अंक २०८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२९ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# करंजा-रेवस आता १५ मिनिटांत

## धरमतर खाडीवरील पुलासाठी निविदा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**कोकण किनारपट्टीवर रेवस ते रेड्डी दरम्यान उभारण्यात येणाऱ्या सागरी महामार्गावरील कारंजा ते रेवस दरम्यानच्या धरमतर खाडीवर २ किलोमीटर लांबीचा पूल उभारण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पात्र कंत्राटदारांकडून निविदा मागविल्या आहेत. या निविदा अंतिम होऊन लवकरच या पुलाच्या कामाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे सध्याच्या प्रवासासाठी लागणारा एक ते दीड तासाचा वेळ १५ मिनिटांवर येणार आहे.**



रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील कारंजा आणि अलिबाग जिल्ह्यातील रेवस ही दोन गावे खाडीच्या दोन बाजूंना आहेत. सद्यस्थितीत कारंजा येथून खाडी पार करून बोटीने रेवसला जाण्यासाठी केवळ १५ मिनिटांचा वेळ लागतो. मात्र कारंजा आणि रेवस दरम्यान रस्तेमार्गाने प्रवासासाठी ६० किमी अंतर कापावे लागते. मात्र खाडीपुलामुळे हे अंतर १० किमीवर येणार आहे. या दोन गावांदरम्यान खाडीवर पूल बांधावा, अशी मागणी १९८०च्या दशकात करण्यात आली होती. तत्कालीन मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांनी त्याला मंजुरीही दिली होती. मात्र तेव्हा काही कारणांमुळे हा प्रकल्प होऊ शकला नाही. त्यामुळे गेल्या ४० वर्षांपासून कारंजा–रेवस दरम्यान खाडी पुलाची प्रतीक्षा आहे.

एमएसआरडीसीने या पुलाच्या उभारणीसाठी स्वारस्य निविदा मागविल्या होत्या. याला सुमारे १५ कंत्राटदारांनी प्रतिसाद दिला होता. त्यातील ११ निविदा पात्र ठरल्या आहेत. या पात्र कंत्राटदारांकडून पुलाच्या उभारणीसाठी एमएसआरडीसीने निविदा मागविल्या आहेत. यानुसार आता धरमतर खाडीवर प्रत्येकी २ मार्गिकांचा २.०४ किमी लांबीचा पूल उभारला जाणार आहे. त्यासाठी ८९७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. धरमतर खाडीवर स्टील सुपरस्ट्रक्चर पद्धतीचा पूल उभारला जाणार असून, पुलाखालून बोटींना ये–जा करता यावी याकरिता १२० मीटर लांबीचे दोन स्पॅन उभारले जाणार आहेत.

### रेवस ते रेड्डी ४४७ किमी सागरी मार्ग

रेवस ते रेड्डी दरम्यान उभारल्या जाणाऱ्या सागरी महामार्गासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती आणि रुंदीकरणाचे काम केले जाणार आहे. सुमारे ४४७ किमी लांबीचा हा सागरी मार्ग असेल. या मार्गावर खाडी भागात आठ ठिकाणी नवीन खाडी पुलांचे आणि दोन उड्डाणपुलांचे काम प्रस्तावित आहेत. या सागरी मार्गासाठी ९५७२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. तसेच कोकणातील ९३ पर्यटनस्थळांना या मार्गाने जोडण्याचा विचार आहे.

# अपुऱ्या जागेतील टपाल कार्यालयामुळे कामोठेकरांची होत आहे गैरसोय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**शहरापासून दूर आणि अपुऱ्या जागेतील टपाल कार्यालयामुळे कामोठेतील नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे नागरिकांना दळणवळणासाठी सोयीचे होईल, असे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी टपाल कार्यालय स्थलांतरित करण्याची मागणी होत आहे.**


कामोठेची लोकसंख्या तीन लाखांच्या घरात गेली आहे. मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना सरकारी कार्यालयात खेटे मारावे लागत आहेत. सेक्टर ५ येथे मारुती सोसायटीत ५०० चौरस फुटांच्या जागेत विभागीय टपाल कार्यालय आहे. या कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे. कार्यक्षेत्राचा विचार करता सध्याच्या कार्यालयाची जागा अपुरी आहे. पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून या टपाल कार्यालयाचे मध्यवर्ती ठिकाणी स्थलांतर करण्याची आवश्यकता आहे. दररोज सुमारे १५०० पत्र स्पीड व रजिस्टर्ड पोस्टाने आणि सरासरी ४ हजार पत्र साध्या टपाल सेवेने पाठवली जातात. पार्सल व आधार कार्ड दुरुस्तीची सेवा, बचत खाते, आवर्ती ठेव आदी पोस्टाच्या योजनांच्या कामासाठी नागरिकांची गर्दी असते. अशातच कार्यालयातील उप–पोस्ट मास्टर, २ सहाय्यक आणि १२ पोस्टमन अशा १५ कर्मचाऱ्यांच्या जोरावर सध्या कार्यालयाचा कारभार सुरू आहे. त्यामुळे अपुऱ्या जागेमुळे या कर्मचाऱ्यांना कार्यालयात अत्यंत दाटीवाटीने काम करावे लागत असल्याने पर्यायाने नागरिकांना त्याचा त्रास होत आहे.

# बंदरातील गाळामुळे जलप्रवासात खोळंबा

## प्रवाशांकडून संताप व्यक्त

**दै.रायगड नगरी । उरण**

मोरा ते मुंबई दरम्यानच्या जलसेवेत मोरा बंदरातील गाळाचा अडथळा निर्माण होऊ लागला असून शुक्रवारी सायंकाळी ५.३० नंतर साडेतीन तासांसाठी ही जलसेवा बंद ठेवण्यात आली. त्यामुळे या मार्गावरील मुंबई व मोरा येथून ये–जा करणारे प्रवासी व चाकरमानी यांच्या प्रव–ासाचा खोळंबा होत असल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त केला.



मागील अनेक वर्षांपासून कोट्यवधी रुपयांचा खर्च करून लाखो क्यूबीक मीटर गाळ काढला जात आहे. मात्र तरीही दरवर्षी मोरा बंदरात गाळाची समास्या कायम आहे. त्यामुळे या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे. मोरा मुंबई हा जलमार्ग महत्वाचा असून उरण ते मुंबई दरम्यानचा हा जलद प्रवासाचा मार्ग म्हणून दररोज हजारो प्रवासी या मार्गाने प्रवास करीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने उरणमधून मुंबईत नोकरी निमित्ताने ये–जा करणारे चाकरमानी दररोज प्रवास करीत आहेत. सायंकाळी कार्यालय सुटण्याच्या वेळेतच समुद्राला ओहटी लागत असल्याने किनार्यावरील गाळात प्रवासी बोट अडकू नये यासाठी मुंबईतील भाऊचा धक्का तसेच मोरा या दोन्ही बंदरातील वाहतूक बंद केली जात आहे.

मोरा बंदरातील गाळ काढण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे मागणी करण्यात आली आहे. मात्र समुद्राच्या ओहटीमुळे सायंकाळी मोरा ते मुंबई ही जलसेवा काही तास बंद आल्याची माहिती मोरा बंदराचे अधिकारी प्रकाश कांदळकर यांनी दिली आहे.

# पनवेल एसटी आगारासाठीच्या प्रवासी संघाच्या लढ्याला संघर्ष समितीचा पाठींबा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रवाशांच्या सोयीसुविधा आणि न्याय हक्कासाठी लढता लढता पन्नाशीकडे झुकलेल्या पनवेल प्रवासी संघाने राज्य परिवहन मंडळाच्या पनवेल एसटी बस आगाराच्या पुनर्निमितीकरिता लाक्षणिक आंदोलनाचे हत्यार उपासले आहे. त्याकरिता पनवेल संघर्ष समितीच्या पाठींब्यासाठी प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ. भक्तीकुमार दवे यांनी सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांची भेट घेतली. कडू यांनी पनवेल संघर्ष समितीसह इतर संलग्न संघटनांचाही पाठींबा घोषित करून राज्य सरकारला झटका दिला आहे.



एक तापाहून अधिक काळ पनवेल एसटी आगाराचे वाळवंट पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत ताटकळत असल्याने अखेर पनवेल प्रवासी संघाला राज्य सरकार, स्थानिक आमदार, खासदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदाधिकारी, अधिकाऱ्यांना जागे करण्यासाठी लाक्षणिक उपोषणाचे आंदोलन छेडण्यासाठी पावले टाकावी लागली आहेत. येत्या गुरुवारी, ३ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता पनवेल बस आगारात हे आंदोलन घेडण्याचा निर्धार डॉ. दवे आणि त्यांच्या संघाने जाहीर केला आहे. त्याच पार्श्वभूमी आज शुक्रवारी (ता. २८) डॉ. भक्तीकुमार दवे, पनवेल जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिजित पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव सुदाम पाटील, उद्योजक प्रताप गावंड, राकेश जाधव आदींनी कडू यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली.

यावेळी उभायतांमध्ये झालेल्या चर्चेतून पनवेलच्या ग्रामीण भागातील जनतेची जीवनवाहिनी असलेली राज्य परिवहन मंडळाची लालपरी आगाराच्या दूरवस्थेमुळे तोट्यात चालली आहे. प्रवासी सेवा सुरळीत होत नाही आणि आगाराची इमारत अस्तित्वात नसल्याने इतर सोयी सुविधांच्या आभावामुळे प्रवाशांनी पाठ फिरवली असल्याचे मत चर्चेतून समोर आले.

नागरिकांच्या हक्कासाठी आणि पनवेलच्या महत्वाच्या शासकीय इमारतीपैकी एक असलेल्या पनवेल आगाराची इमारत बांधा आणि वापरा तत्वावर लवकरच पूर्ण न केल्यास राज्य सरकारला त्याची किंमत मोजावी लागेल, असा इशारा डॉ दवे, अभिजित पाटील आणि सुदाम पाटील यांनी संयुक्तिकरित्या दिला आहे.

### प्रवासी संघाची लोकभावना लक्षात घेवून आंदोलनात शेकाप ताकदीने उतरणार!

कोकणचे प्रवेशद्वार असलेल्या पनवेल शहरातील राज्य परिवहन विभागाच्या पनवेल आगाराची अवस्था पाहता राज्य सरकराची शोकांतिका मानावी लागेल. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन उदघाटन केल्यानंतरही आतापर्यंत गेल्या तीन चार वर्षात एक वीट रचली गेली नाही हे सरकारचे अपयश आहे. अशा पद्धतीने राज्य सरकार वारंवार लोकांना मूर्ख ठरवत असेल तर त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे, म्हणूनच शेकापच्या कार्यकर्त्यांनी सर्व ताकदीनिशी या आंदोलनात उतारावे, असे आवाहन शेकाप आमदार बाळाराम पाटील यांनी केले. आज सकाळीच डॉ. दवे आणि सहकाऱ्यांनी नावडे येथे आ. पाटील यांची भेट घेवून आंदोलनात सहभागी होण्याचे पत्र दिले. त्यावेळी पाटील बोलत होते.

# प्रशासनाच्या अनास्थेमुळे वाहतूक कोंडी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दरवेळी ऐन सुट्ट्यांच्या हंगामात माथेरान मधील सर्वच अधिकारी वर्गाच्या हलगर्जीपणा मुळे आणि शून्य नियोजनाअभावी घाटरस्त्यात मोठया प्रमाणात वाहनांची वाहतूक कोंडी होत असल्याने पर्यटकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



येथील मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावरील मालवाहतूक सामानाने संपूर्ण परिसर व्यापलेला आहे. जागोजागी अस्ताव्यस्त इमारतीचे सामान विखुरलेल्या अवस्थेत असल्याने पर्यटकांना आपल्या किंमती महागड्या गाड्या पार्किंग करता येत नाहीत अनेकदा कुठेतरी जंगलात झाडाखाली पार्क करून त्यांना माथेरान गाठावे लागत आहे तर या पार्किंगच्या सुशोभीकरणा साठी एमएमआरडीए च्या माध्यमातून जवळपास पाच कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.हा सर्व खर्च गंगाजळीत गेला आहे.कारण याठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणावर केलेला खर्च दिसून येत नाही. झाडांना सुरक्षित कठडे लावून जागा व्यापलेली आहे, ना त्याठिकाणी मोटार वाहन पार्किंग करण्यासाठी सुसज्ञ जागा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न केले गेलेले नाहीत. पाच कोटी रुपये केवळ ठेकेदारांना पोसण्यासाठीच खर्च केले आहेत की काय असाही प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे.

याठिकाणी पॅनोरमा पॉईंट रस्त्यावर जवळजवळ शंभर गाडया पार्क होत होत्या तो मार्ग सुध्दा बंद करण्यात आला आहे त्यामुळे त्याच गाडया पर्यटकांना घाटात कुठेही पार्क करून ऐन उन्हातान्हात मुलाबाळांना सामान घेऊन पायपीट करावी लागत आहे त्यामुळे त्यांचा वेळ सुध्दा खर्ची जात आहे.यास सर्वस्वी जबाबदार इथले सर्वच खात्यांचे अधिकारी आहेत असे बोलले जात आहे. सर्वांना पूर्ण कल्पना असते की ऐन सुट्ट्यांमध्ये जागेअभावी पार्किंगची समस्या नेहमीच निर्माण होत असते त्यासाठी अगोदरच नगरपालिका प्रशासन, अधीक्षक कार्यालय, पोलीस प्रशासन आणि वनखात्याचे अधिकारी यांनी एक विशेष बैठक घेऊन याबाबत नियोजन करणे आवश्यक असते परंतु तसे न केल्यामुळे याचा नाहक त्रास येणाऱ्या पर्यटकांना सोसावा लागत आहे आणि यामुळे इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. दिवाळी, नाताळ आणि मे महिन्यातील ठराविक दिवस सुट्ट्यांचा हंगाम असतो त्यावेळी मालवाहतूक करणाऱ्या मंडळींना माल ठेवण्यास बंदी करणे गरजेचे आहे. गर्दीमध्ये ह्या मालवाहतूकीमुळे अनेक गाड्यांचे नुकसान होत असते.

> या सुट्टयांच्या हंगामात दस्तुरी नाक्यावर नगरपरिषदेच्या माध्यमातून आम्ही तीन कामगार नेमलेले आहेत.पार्किंग साठी ही जागा अपुरी पडते. याठिकाणी असणारा एमपी ९३ हा प्लॉट नगरपरिषदेकडे वर्ग झाल्यास पुढील काळात वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होणार नाही.
>
> **सुरेखा भणगे ( शिंदे ) प्रशासक तथा मुख्याधिकारी माथेरान नगरपरिषद**

# सिडकोच्या भू संपादन प्रक्रियेला शेतकऱ्यांचा प्रखर विरोध

**दै.रायगड नगरी । उरण**

**सिडकोने उरण तालुक्यातील चाणजे मधील ९९१, नागाव – १२७, रानवड १६० बोकडविरा–३३ पाणजे – ३ वं फूडे येथील ४ नवघर मधील २ असे एकूण १ हजार ३२० सर्व्हे नंबर मधील ३६६ हेक्टर जमीन संपादित करण्यासाठी १२ ऑक्टोबर २०२२ रोजी एका वर्तमानपत्रातून जाहीर केले. मात्र उरण मधील सिडकोच्या या आरपी झेड प्रकल्पासाठी होणाऱ्या भू संपादनाला विरोध करत उरण येथील नागाव, चाणजे , रानवड, बोकडविरा, फुंडे,नवघर,पाणजे आदी गावातील १५०० शेतकऱ्यांनी काल सिडको भवनावर जाउन सिडकोच्या भूसंपादन निर्णयाचा निषेध करत सिडकोच्या भू संपादनाच्या निर्णया विरोधात हरकती नोंदविल्या.**

१९७० साली सिडकोने विकासाच्या नावाखाली उरण मधील ११ हजार हेक्टर पेक्षा अधिक जमीन संपादित केली आहे. त्यानंतर आज ५२ वर्षानी पून्हा उरण मधील उर्वरीत शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करण्यासाठी सिडकोने पुन्हा प्रक्रिया सुरु केली आहे.त्यामुळे उरण मधील मूळ जमीन मालक, स्थानीक नागरिक पुन्हा एकदा हद्दीपार होणार आहेत. अशा सिडकोच्या विविध निर्णयामुळे उरण मधील स्थानिक नागरिकांवर उपरे होण्याची वेळ आली आहे.जमीन संपादन झाल्यावर पुढे काय ? अशी भविष्याची चिंता शेतकऱ्यांना भेडसावत आहे.

सिडकोच्या भूसंपादनाची नोटीस दि १२ ऑक्टोबर २०२२ रोजी एका दैनिकात प्रसिद्ध झाली होती. दि २७ ऑक्टोबर २०२२ रोजी दैनिकात जाहिरात प्रसिद्ध होऊन १५ दिवस पूर्ण झाल्याने उरण विभागातील शेतकऱ्यांनी सिडकोच्या भूसंपादन कायद्याला विरोध करण्यासाठी व वैयक्तिक हरकती नोंदविण्यासाठी कोकणभवन येथील कॉ.भाऊ पाटील चौकात एकत्र आले.व तेथून सर्व शेतकरी सिडकोच्या भूसंपादन विभागाच्या कार्यालयावर धडकले.यावेळी सिडकोच्या भूसंपादन विभागात १५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी वयक्तिक हरकती नोंदविल्या.

गावठाण हक्क परिषद व चाणजे शेतकरी समितीने केलेल्या मागणी नुसार सिडको भूसंपादन व भूमापन विभागाने शेतकऱ्यांना हरकती नोंदविण्यासाठी आणखी १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. शेतकऱ्यांनी स्वतः साठी बांधलेली तसेच विविध विभागातील स्थानिक नागरिकांनी शेतकऱ्यांकडून जमिनी खरेदी करून घरांचे बांधकाम केले आहे. अशा प्रकारची हजारो घरे या जमिनीवर आहेत.सिडकोच्या या भूसंपादनाच्या प्रक्रियेमध्ये या राहत्या घरांचाही प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे उरणमधील शेतकरी व नागरीकांकडून या भू संपादन निर्णयाला प्रचंड विरोध असून सिडको प्रशासनाच्या या निर्णया विरो–धात प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

यावेळी कॉ.भूषण पाटील, सुधाकर पाटील, काका पाटील, जगदीश तांडेल, संजय कडू, परिक्षीत ठाकूर, अनंत घरत, जूनूशेट थळी, काशिनाथ गायकवाड, सरपंच चेतन गायकवाड, उपसरपंच भुपेंद्र घरत, गजानन म्हात्रे, माया पाटील, सरपंच रंजना पाटील, रतन पाटील, संध्या ठाकूर, किशोर पाटील, जितेंद्र ठाकूर, एल् .जी. पाटील, अँड प्रदिप पाटील, दत्ता घरत, जे के म्हात्रे, राजाराम पाटील, आप्पा कडू, शरद कडू, बाळू थळी, सिताराम घरत, कमळावर थळी, मोहन काठे, नयन म्हात्रे, महेश म्हात्रे, सरपंच चिंतामण पाटील, मधुसूदन म्हात्रे, माजी सरपंच केगाव महेश म्हात्रे, अरविंद घरत, कॉ. रामचंद्र म्हात्रे, कॉ संजय ठाकुर इत्यादी उरण विभागातील शेतकरी बांधव, ग्रामस्थ उपस्थित होते.



# मौज हवी; जबाबदारी नको

उत्साह आणि अतिउत्साह यांतला फरक समजून घ्यायचाच नाही, असे जणू अनेकांनी ठरवूनच टाकले असावे, अशी अवस्था दिवाळीत राज्यातील सर्वच प्रमुख शहरांची झाली होती. दाट वस्ती, मोठमोठ्या इमारती यांमुळे धूर विरळ होण्यास लागणारा उशीर आणि बंदिस्त जागेत फटाके फोडू नयेत या साध्या, सर्वसामान्य संकेताचाही पडलेला विसर यामुळे दिवाळीचे तीन-चार दिवस अनेकांना मनस्ताप झाला. मोठ्या संख्येने लोकांना खोकल्याने हैराण केले आणि विविध ठिकाणी लागलेल्या आगींमुळे मालमत्तेचेही मोठे नुकसान झाले. 'सण उत्साहाने साजरा करा' अशा शुभेच्छा राज्यकर्त्यांनी दिल्या होत्या, त्याचा अर्थ 'तुम्ही अगदी निर्धास्त होऊन इतरांना त्रास द्या' असा होत नाही. मात्र गणेशोत्सवापासूनच सण-समारंभ उत्साहाने साजरे करण्याची शासनाने दिलेली मोकळीक आणि प्रोत्साहन यांच्या गैरवापराचा कळस झाल्याचे दिवाळीच्या चार दिवसांत दिसून आले. ध्वनिप्रदूषणाच्या आणि वातावरण प्रदूषणाच्या पातळीत कमालीची वाढ होण्यास हातभार लावणाऱ्यांमध्ये दुर्दैवाने लहानांसोबत मोठ्यांचाही सहभाग असल्याचे अनेक ठिकाणी पाहावयास मिळत होते. समाज म्हणून प्रदूषणाच्या धोक्यांबाबतचे भान अजूनही आपल्याला येत नाही हे खरोखरच दुर्दैवाचे आहे. करोनाचा कहर ओसरल्यावर जनतेला निर्बंधमुक्त वातावरणाचा आनंद लुटू द्यावा, दोन वर्षांच्या सामाजिक बंदिवासातून झालेल्या सुटकेनंतर मोकळा श्वास घेऊ द्यावा यासाठी शासनाने गणेशोत्सवापासूनच सोहळे साजरे करण्यास प्रोत्साहन दिले होते. खुद्द 'सरकार'मध्येही 'सुटका झाल्याची' भावना प्रबळ होती त्यामुळे यंत्रणांनाही फार ताणून न धरण्याच्या सूचना 'अनधिकृत'पणे दिल्या गेल्या असाव्यात. त्यामुळे मंडपांनी रस्ता व्यापण्यापासून तर दांडियाने घड्याळाच्या काट्यांकडे दुर्लक्ष करण्यापर्यंत अनेक प्रकार सुरू होते. त्यातून सामान्य नागरिकांची अडचण झाली तर कोणी त्यावर फारसे भाष्य करत नव्हते. मात्र दिवाळी येता येता 'उत्सव बहु झाले' अशी अनेकाची अवस्था झाली आणि फटाक्याच्या धुरांनी आसमंत भरून गेला, अस्थमा, दमा असलेल्या रूग्णांचे श्वास कोंडू लागले तेंव्हा हा 'अतिउत्साह' किती तापदायक आहे हे दिसू लागले. दिवाळीच्या दिवसांतल्या 'सोमवारी' दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित हवेचे शहर ठरले. मुंबई आणि इतर अनेक शहरांची अवस्थाही फार वेगळी नव्हती. अगदी दिवाळी संपल्यानंतरचा गुरुवार विचारात घेतला तरी त्या दिवशीही दिल्ली आणि मुंबई या शहरांमधील हवेतील प्रदूषणाची पातळी 'घातक' आणि 'अतिघातक' याच श्रेणींत मोडणारी होती. न्यायालयाने रात्री १०.३० नंतर 'आवाज' नको असे जे म्हटले आहे ते केवळ सार्वजनिक सभा-समारंभांपुरते मर्यादित नाही. सार्वजनिक जागी फटाके फोडल्याने होणाऱ्या आवाजालाही हे बंधन लागू होते. मात्र या नियमाचे सर्रास उल्लंघन होताना दिसत होते. मध्यरात्री एक-दीड वाजेस्तोवर मोठ्या आवाजाचे फटाके फोडले जात होते. अनेक ठिकाणी तर 'उठा उठा पहाट झाली, फटाके फोडायची वेळ झाली' असे सांगून ठेवले आहे की काय, असे वाटण्याजोगी स्थिती होती. कुणाच्या घरात लहान बाळे असतील, वृद्ध व्यक्ती असतील, कुणी काम करुन रात्री उशिरा झोपले असेल याची कुठलीही तमा न बाळगता पहाटे पाच वाजताच सुतळी बॉम्ब, तेही पाठोपाठ फोडणारांना विकृत आनंद मिळत असावा. हवेत उंच जाण्याऐवजी दिशा बदलून आडवी धाव घेणारी रॉकेट्स, फुसका आहे असे वाटल्याने दुर्लक्ष झाल्यावर अचानक फुटणारा बॉम्ब, 'ठिणग्याचा पाऊस' पाडण्याऐवजी अचानक आवाज करीत फुटणारे फटाके अशांनी राज्यभरात पन्नासहून अधिक ठिकाणी छोटया छोट्या आगी लागल्या. नेहमीच्या तुलनेत यावर्षी फटाक्यांमधून निघणाऱ्या धुराचे प्रमाण अधिक होते, असे निरीक्षण काहींनी नोंदवले आहे. त्याचे कारण काय असेल ते असो, परंतु संध्याकाळच्या वेळी जणू धुके साचावे तसा धुराचा पडदा अनेक ठिकाणी दिसत होता, हे खरे आहे. त्याचा अनेकांना त्रासही झाला. करोना संपल्यावर कपाटात जाऊन पडलेले मास्कही या धुरामुळे बाहेर आल्याचे काही ठिकाणी दिसत होते. विदेशातील अनेक ठिकाणी शहराबाहेरील एखाद्या मोकळ्या मैदानात फटाके फोडण्याची, आतषबाजी करण्याची जागा निश्चित केली जाते. ज्यांना हौस भागवायची असेल त्यांना त्याच ठिकाणी जाऊन फटाके फोडावे लागतात. दाट वस्ती आणि उंच इमारती असणाऱ्या मोठ्या शहरांमध्ये अशी काही मैदाने ठरवली गेली तर अनेकांचा त्रास वाचेल. अनेक सोसायट्यांमध्ये आतली मोकळी जागा, मजल्यांवर मध्यभागी असलेल्या मोकळ्या जागा, पार्किंगच्या बाजूला मुले फटाके फोडताना सर्रास दिसतात. त्यांच्या कुटुंबियांना त्यातला धोका दिसत नाही आणि दाखवून दिलेला आवडत नाही, अशी आपली एकूण सामाजिक मानसिकता आहे. त्यामुळेच रस्त्यात झालेला 'फटाक्यांचा कचरा' फटाक्यांची रिकामी झालेली पिशवी आणि विझलेल्या, अर्धवट वितळलेल्या मेणबत्त्यांची कलेवरे तशीच रस्त्यावर टाकून आपण उत्सव साजरा करतो. 'मौज हवी, जबाबदारी नको' या भावनेचा लोप होईल तेव्हाच दिवाळीचा खरा प्रकाश पसरेल.

# पाळिव प्राण्यांच्या कत्तल प्रकरणात दोन आरोपींना पकडण्यात पोलिसांना ग्रामस्थांच्या सहकार्याने यश

## वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षकांची धडाकेबाज कामगिरी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील गारंबी धरणावर जाणाऱ्या रस्त्याच्या अलिकडील भागात एका झुडपात पाच प्राणीव प्राण्यांची कत्तल करण्यात आली होती. तदनंतर पोलिस प्रशासन खडबडून जागे झाले होते.सदर आरोपींचा शोध घेण्यासाठी अलिबाग मुख्यालयातून शोध घेण्यासाठी श्वानपथक आमंत्रित करण्यात आले होते.

कत्तल झालेल्या ठिकाणी काही वस्तू टाकून अज्ञात कत्तल खोर पसार झाले होते. सदरील सर्व वस्तूंचा वास श्वासांना देण्यात आला तसेच मुरुड पोलीसांनी घटना घडलेल्या स्थळापासून शेजारील असणारी गावे शिघ्रे, पारगाण, धनगरवाडी आदी ग्रामस्थांना भेटून अज्ञात व्यक्ती दिसल्यास त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले होते. श्वान पथकाने शोध घेऊन सुद्धा आरोपी सापडले नव्हते.परंतु पारगाण जंगल भागात एक ग्रामस्थ यांना दोन अनोळखी इसम दिसून आले. त्यांनी तात्काळ मुरुड पोलीसांना खबर दिली. खबर मिळताच पोलिसांनी ट्रॅप लावून या आरोपींना पकडण्यात ग्रामस्थांच्या सहकार्याने यश आले. श्वानाला चप्पलचा वास दिल्यानंतर श्वान आरोपी पळाले त्या दिशेला पळत होता आणि त्याच्या मागोमाग श्वान पथकातील कर्मचारी तसेच महिला पोलिस उपनिरीक्षक खुतिजा शेख स्वतः आणि पो.शि. लोहार असे जंगल भागात धावत होतो, जंगलात लपलेल्या आरोपींना याची भनक लागली त्यांना श्वासांचा आवाज तसेच गाड्या वाहनांचे आवाज आल्याने त्यांनी तिथून पळ काढला, व पुढे पळत पळत पारगाव गावात शिरले, गारंबी डॅम मधून पळताना ते भिजलेले होते. पाठलागकरुन त्यांना पकडण्यात आले.

यावेळी पारगान धनगरवाडी, फणसवाडी ग्रामस्थ व धनगर समाजाचे तालुका अध्यक्ष धर्माजी हिरवे उपस्थित होते. सदरील आरोपी मुंबई -शिवडी विभागात राहात असून आरोपी एजाज रमजान खान, सलमान सलीम शेख यांच्यावर भा.द.वि.कलम ३७९,४२९ व महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा कायदा १९९५ चे कलम ५(ब), ५(क), ९, ९(अ) आदी नियमाद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील तपास पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षक खुतिजा शेख व सहकारी पोलिस करत आहेत.

मुरुड केळघरमार्गे रोहा मागावरील गारंबी रस्त्याकडेच्या झुडपात गुरुवारी पहाटे पाच पाळीव गुरांची हत्या करून त्याचे मांस वाटप करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला. गस्त घालणाऱ्या पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला होता. मुरुड तालुक्यातील विविध भागांत पाळीव जनावरांची कत्तल करण्याचे प्रकार गेल्या काही दिवसांपासून वाढले होते.

दरम्यान, या प्रकाराने परिसरात खळबळ उडाली होती. धनगरवाडी - पारगान परिसरातील गेल्या काही दिवसांतील मुरुड-केळघर मार्गावर घडलेली ही तालुक्यातील पाचवी घटना आहे. त्यामुळे परीसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पाळिव प्राण्यांच्या कत्तल प्रकरणात दोन आरोपींना पकडण्यात पोलिसांना ग्रामस्थांच्या सहकार्याने यश आल्याने परीसरातून कौतुक व समाधान आहे.

# म्हसळ्यात गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान किल्ले स्पर्धाचा निकाल जाहीर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिवाळी सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी, दिवाळी सण आणि किल्ला यांचे नाते अतूट लहान मुलांना समजण्यासाठी म्हसळ्यामध्ये भव्य किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. दिवाळी सुटीत शालेय मुलांसह तरूणाईच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी.

शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचे पोवाडे गात अवघ्या महाराष्ट्रात आजही किल्ले उभे आहेत. प्रत्येक किल्ल्याचा इतिहास वैशिष्ट्यपूर्ण तर आहेच; शिवाय तो सुवर्णाक्षरांनी सजलेला आहे. किल्ल्यावरील वास्तू, तटबंदी, दारू कोठार, नगारखाना, राजदरबार, जल व्यवस्थापन हा नेहमीच मराठी माणसाच्या कुतूहलाचा विषय राहिला आहे. शिवछत्रपतींच्या पराक्रमाचे मूक साक्षीदार असलेल्या या किल्ल्यांबद्दल आजही मराठी मनांत मोठा आदर आणि अभिमानही आहे. या किल्ल्यांसारखे छोटे-छोटे किल्ले साकारले जावेत आणि नव्या पिढीला महाराष्ट्रातील शौर्याचा इतिहास कळावा, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली होती.

किल्ल्यांच्या प्रतिकृती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची आपल्याला साक्ष देतात. दिवाळी सण आणि किल्ला यांचे नाते अतूट आणि जुने आहे. दिवाळीत बनवण्यात येणाऱ्या किल्ल्यांच्या प्रतिकृती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची आपल्याला साक्ष देतात. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे शूर मावळे यांच्या शौर्याची साक्ष देणारे असे हे किल्ले दिवाळीत अनेक ठिकाणी बनवले जातात. दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा फार पूर्वीपासूनची आहे. हीच परंपरा जपण्याचा प्रयत्न म्हसळ्यातील गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान करतेय. गेल्या आठ वर्षांपासून म्हसळ्यातील गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठानकडून किल्ले स्पर्धा भरवली जात आहे. यंदाही म्हसळ्यामध्ये ही स्पर्धा भरवण्यात आली होती. दरवर्षीप्रमाणेच या वर्षीही या किल्ले स्पर्धेत स्पर्धकांनी मोठा सहभाग घेतला होता. शिवरायांच्या कर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या अनेकाविध किल्ल्याच्या प्रतिकृती दाखवण्यात आल्या होत्या. या स्पर्धेच्या निमित्ताने पब्जी आणि कार्टूनच्या जगात वावरणाऱ्या



मुलांना शिवरायांचा इतिहास, गड-किल्ले यांची जवळून ओळख व्हावी असा प्रयत्न या प्रतिष्ठानकडून केला जातोय. गडलक्ष्मी प्रसन्न झाल्यावरच स्वातंत्र्य आणि स्वराज्य लक्ष्मी आपल्याला लाभली आहे असा मराठी इतिहास सांगतो. या दिवाळी निमित्त घरोघरी बांधलेल्या किल्ल्यांच्या प्रतिकृतींमुळे हीच लक्ष्मी तुम्हा आम्हांवर अशीच प्रसन्न होउदे. दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा फार पूर्वीपासूनची आहे. हीच परंपरा जपण्याचा प्रयत्न म्हसळ्यातील गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान करतेय. दरवर्षीप्रमाणेच या वर्षीही या किल्ले स्पर्धेत स्पर्धकांनी मोठा सहभाग घेतला होता. शिवरायांच्या कर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या अनेकाविध किल्ल्याच्या प्रतिकृती दाखवण्यात आल्या होत्या. ह्या स्पर्धेचे यंदाचे नववे वर्ष असून शहरातून उत्तम प्रतिसाद मिळाला.

पुढिल वर्षी प्रतिष्ठानचा तालुका पातळीवर स्पर्धा आयोजित करण्यात मानस आहे.

शिशू गट (बाल गट) : प्रथम क्रमांक: कु. महंत रणजित बारटक्के (अजिंक्यतारा) द्वितीय क्रमांक : कु. शांभवी समीर दिवेकर व अनन्या उदय कळस (सिंधुदुर्ग) तृतीय क्रमांक (विभागून) : कु. अक्षरा निलेश परबळकर व स्मित निलेश परबळकर (शिवनेरी) आणि कु. आर्यन जितेंद्र म्हशिलकर व कु. यज्ञा हेमंत बारटक्के (रायगड) लहान गट : प्रथम क्रमांक :कु. नक्ष राहूल काते व कु. शौर्य राहूल काते (मुरूड जंजिरा) द्वितीय क्रमांक: कु. ओमकार उदय चोगले (किल्ले पुरंदर) तृत्तीय क्रमांक: (विभागून) कु. शर्वरी संतोष खताते (प्रतापगड) आणि कु. श्रावणी महेश म्हशिलकर (रायगड) मोठा गट : प्रथम क्रमांक: कु. श्रेयस शशिकांत महाडिक (किल्ले पन्हाळा) द्वितीय क्रमांक : कु. कौशिक अविनाश बोरकर व कु. पायल अविनाश बोरकर - (मुरूड जंजिरा) तृतीय क्रमांक : कु. विराज विजय खताते (विशालगड) यांनी पटकावला आहे सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येणार आहे हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष श्री. सचिन करडे, संतोष कुडेकर, कौस्तुभ करडे, श्रेया करडे, विशाल सायकर, यतीन करडे, बाबू बनकर, संतोष उद्धरकर, सुशील यादव, राजेश करडे, युवराज करडे, शुभम करडे यांनी मेहनत घेतली.

# उपोषण करणाऱ्या अविनाश ठाकूर यांच्या नोकरीबाबत निर्णय न घेतल्यास ९ तारखेला गेट बंद आंदोलन



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील भेंडखळ येथील बी पी सी एल कंपनीसाठी जमीन संपादित करून सुध्दा नोकरी न देणाऱ्या बी पी सी एल कंपनीच्या अन्यायाविरोधात आमरण उपोषण करणाऱ्या भेंडखळ गावचे स्थानिक रहिवाशी तथा प्रकल्पग्रस्त अविनाश रमण ठाकूर यांच्यासह इतर शिल्लक राहिलेले दाखला धारक प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीबाबत निर्णय न घेतल्यास ९ नोव्हेंबर २०२२ तारखेला गेट बंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर व उरण विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत यांनी बी पी सी एल कंपनी प्रशासनाला गुरुवार दिनाकं २७ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीत दिला आहे.

या बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर व उरण विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत यांच्यासह कामगार नेते भूषण पाटील, प्रा एल बी पाटील, उरण सामाजिक संघटनेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, महिला तालुका अध्यक्ष सिमा घरत, संध्या ठाकूर, डोंगरी शाखाप्रमुख सचिन पाटील, लक्ष्मण ठाकूर, सूनित घरत, कृष्णा ठाकूर, योगिता ठाकूर, चित्रा ठाकूर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील, बी पी सी एल कंपनी प्रशासनातील अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. उपोषण कर्ते अविनाश ठाकूर यांची प्रकृती खालावल्याने दि २५ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून साखळी उपोषणाला सुरवात झाली आहे. आता बीपीसीएल कंपनी सोबत झालेल्या बैठकीत थेट गेट बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आल्याने बीपीसीएल प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते याकडे सर्व शेतकऱ्यांचे, प्रकल्पग्रस्तांचे लक्ष लागले आहे.

# बोगस तृतीयपंथी बनलेल्या व्यक्तीला बेदम मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाऊबीजेच्या दिवशी घरोघरी भेट मागण्यासाठी फिरणाऱ्या बोगस तृतीयपंथींना मारहाणीचा प्रकार खारघरमध्ये घडला. सणासुदीच्या दिवशीच हा प्रकार झाल्याने या वेळी परिसरातील बघ्यांची गर्दी झाली होती.

खारघर, सेक्टर बारामधील बैठ्या चाळीत एक व्यक्ती साडी नेसून तृतीयपंथी असल्याचे सांगून भाऊबीजेची मागणी करीत होती. हा प्रकार तृतीयपंथींच्या दुसऱ्या एका गटाला समजला होता.

याबाबतची विचारणा केल्यावर हा प्रकार उघडकीस आल्यानंतर तिघा तृतीयपंथींच्या गटाने बोगस तृतीयपंथी बनलेल्या व्यक्तीला बेदम मारहाण केली होती. हा वाद पाहण्यासाठी गर्दी झाली होती.

हे भांडण काही केल्या थांबत नसल्याचे अखेर खारघर भाजपचे सरचिटणीस दीपक शिंदे यांनी खारघर पोलिस ठाण्याशी संपर्क साधून ताब्यात दिले.

**नर्सिंग कोर्स प्रवेश**

**जी.एन.एम. / ए.एन.एम.**

**सन २०२२ -२३ वर्षाकरीता प्रवेश उपलब्ध**

**-: शैक्षणिक पात्रता :-**

**बारावी उत्तीर्ण (आर्ट्स/ कॉमर्स/ सायन्स)**

**पत्ता: लाईफ लाईन स्कूल ऑफ नर्सिंग एस.टी. स्टँडसमोर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, लाईन आळी, पनवेल**

**संपर्क : ९३७२७१६१६० / ९९४७७२०७७७**

# दहशतवादी गटांच्या आर्थिक स्त्रोतांना आळा घालणे आवश्यक : ना.डॉ. एस. जयशंकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दहशतवादी गटांच्या आर्थिक स्त्रोतांपर्यंत पोहोचून त्यास आळा घालणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व देशातील सदस्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस.जयशंकर यांनी केले. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समितीची बैठक मुंबईमध्ये ताज हॉटेल येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते.

दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत (२६/११) झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्ष तथा गॅबॉन प्रजासत्ताक देशांचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मायकल मौस्सा अडामो प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन दहशतवादविरोधी समितीच्या अध्यक्षा आणि संयुक्त राष्ट्रातील भारताच्या स्थायी प्रतिनिधी राजदूत श्रीमती रूचिरा कंबोज यांनी केले.

भारत २०२२ साठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवाद विरोधी समितीचा अध्यक्ष आहे. या समितीमध्ये सदस्य देशांसह संयुक्त राष्ट्रसंघाच्या १५ देशांतील राजनैतिक अधिकाऱ्यांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समितीची दोन दिवसीय बैठक भारतात होत आहे. उद्या दिल्ली येथे बैठक आहे. मुंबईमध्ये ताज हॉटेल येथे बैठक झाली. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवाद विरोधी समितीने 'दहशतवादाच्या वित्तपुरवठ्याशी लढा' या विषयावर अनौपचारिक चर्चा करण्यासाठी या बैठकीचे आयोजन केले होते. यात स्थानिक आणि क्षेत्रीय पातळीवरील उपाययोजनांसंदर्भात चर्चा झाली.

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. जयशंकर म्हणाले, दहशतवाद विरोधात लढा देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे. दहशतवाद आणि त्यांच्या प्रायोजकांविरुद्ध ठोस कारवाई करावी लागेल. दहशतवाद्यांची सुरक्षित आश्रयस्थाने, प्रशिक्षण स्थळे शोधून त्यांना असलेले राजकीय समर्थन आर्थिक आणि वैचारिक संरक्षण नष्ट करणे आवश्यक आहे.

गेल्या काही वर्षांत, दहशतवादी गटांनी त्यांना मिळत असलेल्या मिळकतीच्या पद्धतीमध्ये विविधता आणली आहे. त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवला आहे. वित्तपुरवठ्यासाठी उपलब्ध असलेल्या अनामिकतेचा फायदा घेऊन व्हर्च्युअल चलने वापरून निधी उभारणी सुरु केली आहे. या संदर्भात, अधिक विचारमंथन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला विचारात घेऊन नाविन्यपूर्ण उपाय योजण्यासाठी उद्या नवी दिल्ली येथे होणाऱ्या समितीच्या विशेष बैठकीत चर्चा होईल, अशी अपेक्षा डॉ. जयशंकर यांनी व्यक्त केली.

दहशतवादविरोधी लढाई ही सर्वांनी एकत्रितपणे आणि एकजुटीने लढणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीनंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना केले. या अनुषंगाने संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी समितीची महत्वपूर्ण परिषद मुंबईत झाली. २६ नोव्हेंबर २००८ रोजी ज्या ताजमहाल हॉटेलवर दहशतवादी हल्ला झाला तेथे या परिषदेचे आयोजन केल्याबद्दल संयुक्त राष्ट्र समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना आणि सदस्यांना त्यांनी मनापासून धन्यवाद दिले.


देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी देशाच्या सुरक्षेविषयी महत्वाची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीस महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांसह सर्व राज्याचे गृहमंत्री उपस्थित असल्याची माहिती मुख्यमंत्र्यानी यावेळी दिली.

# आझम खान यांना मोठा दणका!

## तुरूंगावासाच्या शिक्षेसोबतच आमदारकीही रद्द

**नवीदिल्ली । वृत्तसंस्था**

समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि रामपूरचे आमदार आझम खान यांचे विधानसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. यूपी विधानसभेच्या अध्यक्षांनी त्यांना सदस्यत्वासाठी अपात्र ठरवले. त्यामुळे आता त्यांच्या विधानसभा मतदारसंघ रामपूरमध्ये पोटनिवडणूक होणार आहे. नुकतेच त्यांना द्वेषपूर्ण व चिथावणीखोर वक्तव्य केल्याप्रकरणी तीन वर्षांची शिक्षा ठोठवण्यात आली. यासोबतच त्यांना सहा हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.



द्वेषपूर्ण व चिथावणीखोर विधाने केल्याप्रकरणी दोषी आढळल्यानंतर आणि शिक्षा जाहीर झाल्यानंतर त्यांच्या विधानसभा सदस्यत्वावर संकट आल्याचे मानले जात होते. त्यांना न्यायालयाने शिक्षेसह जामीन दिला असला तरी त्यांना विधानसभेत मोठा धक्का बसला. दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झाल्यामुळे त्यांचे विधानसभा सदस्यत्वही रद्द करण्यात आले. सभापती कार्यालयाकडून ही माहिती देण्यात आली. न्यायालयाच्या आदेशानुसार आझम खान यांना कलम १५३ए, आयपीसी कलम ५०५(१) आणि लोकप्रतिनिधी कलम १२५ अंतर्गत प्रत्येकी तीन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. यासोबतच दोन हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. दंड न भरल्यास त्यांना आणखी एक महिन्याच्या कारावासाची शिक्षा असणार आहे.

शिक्षा सुनावल्यानंतर आझम खान यांची पहिली प्रतिक्रिया दिली. सत्र न्यायालयातून जामीन मिळाल्यानंतर आझम खान म्हणाले की, मी न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करतो. पण या निर्णयाविरुद्ध मी वरच्या कोर्टात नक्कीच अपील करणार आहे. मी याबाबत वकिलांशी चर्चा करणार असून योग्य ती याचिका दाखल करणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## किसन खारके यांना २५ मीटर स्टँडर्ट पिस्तुल स्पर्धेत सिल्वर मेडल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिनांक १७ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२२ केरळ येथे झालेल्या ३१ व्या प्री राष्ट्रीय ऑल इंडिया जी व्ही मावळणकर पिस्तूल शुटींग नेमबाजी स्पर्धेत सिध्दांत रायफल व पिस्तुल व आयएमएस स्कुल उलवे येथील रायगडभूषण किसन खारके नेरे, (पनवेल) यांनी २५ मीटर स्टँडर्ट पिस्तुल नेमबाज यांनी सिल्वर मेडल पटकावले. व १० मीटर पिस्तुल नेमबाजी स्पर्धे त अवनी अलंकार कोळी व अमेय कोळी दिघोडे (ता. उरण) ह्यांची भोपाळ येथे होणाऱ्या ६५ वी राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धे त निवड झाली प्रशिक्षक अलंकार कोळी, सिध्दांत रायफल व पिस्तुल शुटींग क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, रायगड, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण, अंबरनाथ, रत्नागिरी येथिल मित्र परिवार व ग्रामस्थ नेरे, दिघोडे उरण येथील मित्र परिवार आयएमएस व ज्युनिअर कॉलेज उलवे नवी मुंबई गौरी शाह यांच्याकडुन अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

## तळोजामधील नागरिकांना दूषित पाणी पिण्याची वेळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फुटलेल्या जलवाहिनीत ड्रेनेजचे पाणी मिसळल्याने तळोजा सेक्टर अकरामधील काही सोसायटी धारकांना दूषित पाणी पिण्याची वेळ आली आहे. ऐन दिवाळीतच हा प्रकार घडल्याने पालिकेविरोधात रोष व्यक्त केला जात आहे.

तळोजा सेक्टर अकरामधील गणेश मंदिर, जय शक्ती, सुमोध सोसायटीलगत असलेल्या रस्त्यावरील मलनिःसारण वाहिन्या भरून रस्त्यावर वाहत आहेत. अशातच सोमवारी या परिसरात दूषित पाणी पुरवठा होत असल्याची तक्रार रहिवाशांनी सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडे केली होती.

यावेळी गणेश मंदिर रस्त्यावरील मलनिःसारण वाहिन्यांची पाहणी केली असता, पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्यामुळे पाणी मिसळण्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे दिवाळी सणातच तळोजाकरांना दूषित पाणीपुरवठा झाल्याने संतापाची भावना आहे. याविषयी सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडे विचारणा केली असता, गळती लागलेली जलवाहिनी तत्काळ दुरुस्त केल्याची माहिती देण्यात आली.

# किनारा पुन्हा बहरला, जंजिरा पर्यटकांनी फुलला

**दै.रायगड नगरी । मुरुड**

अपेक्षेप्रमाणे दीपावली नंतर आता रायगडच्या पर्यटनाला सुगीचे दिवस आलेले पहायला मिळत आहेत. राज्याच्या विविध भागातून प्रचंड संख्येने पर्यटक रायगडच्या समुद्र किनारी पर्यटन स्थळावर डेरेदाखल झाले आहेत. त्यामुळे येथील पर्यटन व्यवसायाला उर्जितावस्था आल्याचे दिसून येत आहे. मुरुडचा ऐतिहासिक प्रसिद्ध जंजिरा जलदुर्ग तर पर्यटकांनी फुलून गेला आहे.

कोर्लई, साळाव, बारशिव, काशीद, नांदगाव, सर्वे, मुरूड, खोरा बंदर जेट्टी, आगरदांडा जेट्टी, एकदरा खाडी, मुरुड समुद्रकिनारी भागातील प्रसिद्ध धार्मिक स्थळे आणि समुद्रात पोहण्याचा आनंदाने घेण्यासाठी आणि क्रीडा करण्यासाठी पर्यटकांची गर्दी आहे. थंडी सुरू झाली असल्याने पर्यटन आधिक रोमांचित आणि रम्य झाले आहे. मुरुडचा जंजिरा पाहण्यासाठी राज्याच्या विविध भागातून फॅमिली बरोबर पर्यटक मंडळी उपस्थित झाल्याचं दिसून येत आहे.



सुट्टी असल्याने पर्यटकांच्या संख्येत तिपटीने भर पडत असून आम्ही जोडून रजा घेऊन आल्याचे पुणे येथून आलेल्या विराज काटकर, नारायण मुर्ती, नेहा पाटील, स्वाती नेरुरकर आदीनी सांगितले. रायगडात उत्तम समुद्रकिनारे असून येथील हिरवागार रम्य निसर्ग नेहमीच भावतो त्यामुळे आम्ही दिवाळीनंतर ऑफिस मधून खास रजा घेऊन या परिसरात हमखास येतो. अशा प्रतिक्रिया कोल्हापूर, सातारा, सांगली,पुणे मुंबई, जळगाव, येथून आलेल्या विजय जाधव, लता नेरपगार, शालिनी आठवले, राजेश सारंगधर अशा अनेक पर्यटकांनी व्यक्त केल्या.

मुरूड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद बीचवर तर पर्यटकांची बेफाट उपस्थिती गुरुवार पासून वाढत गेली असून शुक्रवारी या मध्ये दुपटीने वाढ झाल्याची माहीती काशीद येथील सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जंगम, यांनी शुक्रवारी दुपारी दिली. येथे पार्किंग देखील अपुरे पडत असल्याचे दिसून आले. मुरूड किनार्यावर मात्र नियोजनबध्द विनामूल्य पार्किंग असल्याने रांगेत वाहने लावण्यांत आली आहेत. साळाव येथील गणेश मंदिर, बारशिव गावचा रॉक बीच, काशीद बीच, मुरुड येथील दत्त मंदिर, जंजिरा जलदुर्ग, कोर्लई किल्ला, नांदगाव येथील प्रसिद्ध साक्षात्कारी श्री सिद्धी विनायक मंदिर, नांदगांव समुद्र किनारा, मुरूड किनार्यावर पर्यटकांची मोठी मांदियाळी दिसून येत आहे.

आधिक माहिती घेता असे कळते की, अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन तालुक्यातील समुद्र किनार्यांवर पर्यटकांची उपस्थिती खूपच मोठी आहे. आगामी काळात शासनाने रायगडच्या सर्व पर्यटन स्पॉट वर महत्त्वाच्या आवश्यक सोयी-सुविधा केल्यास राज्यात रायगड जिल्हा पर्यटन हब होईल, अशा प्रतिक्रिया अनेक पर्यटकांनी व्यक्त केल्या आहेत.

# उरण ते शिर्डी पदयात्रा प्रारंभ

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील देवळी येथील श्री द्वारकामाई पदयात्रा मंडळ च्या वतीने सालाबाद प्रमाणे या वर्षी शुक्रवार ( दि. २८ ) रोजी देवळी -केगाव येथून उरण ते शिर्डी पदयात्रा काढण्यात आली होती ती पालखी श्री क्षेत्र शिर्डी येथे ४ नोव्हेंबर ला पोहचणार आहे, यंदाचे १९ वर्ष आहे.

साई बाबांच्या पालखीचे ठीक -ठिकाणी रांगोळी काढून स्वागत करण्यात आले ठीक -ठिकाणी महिलांनी व साई भक्तांनी दर्शन घेतले, साईभक्त राजा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर सोहळा संपन्न होत आहे. तसेच साई भक्तांचे मोठे सहकार्य लाभत आहे.

केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक येथील श्रीधर बाळकृष्ण म्हात्रे



यांच्या साई कृपा येथील निवासस्थानी सुंदर रांगोळीने घर समोरील अंगण सजविले होते.

देवळी येथील साई बाबांची पालखी येथे थांबते व सर्व साई भक्त साई कृपा घरातील साई बाबांच्या फोटोला नमस्कार करून दर्शन घेतले. अंगणात पालखी जवळ आरती करण्यात आली. पुढे उरण शहराती राघोबा देव मंदिरात सर्व साई भक्तांना नास्ता देण्यांत आला व पुढे पालखी नेण्यात आली. पालखी सोबत केगाव हद्दीतील महिला व साई भक्त पालखी सोबत उरण शहरा पर्यंत सोबत होते.

## मत्स्यव्यवसायाशी निगडित समस्यांसाठी समिती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यामध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसायासाठी विविध बाबींवर उपाययोजना करून समस्यांचे निवारण करण्याकरिता शासनाने सर्व जिल्ह्यांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्याबाबत मान्यता दिली आहे.

मत्स्यव्यवसाय हे अनेक मच्छिमारांसाठी उत्पन्नाचे आणि रोजगाराचे साधन म्हणून काम करते. राज्य शासनामार्फत मत्स्यव्यवसाय क्षेत्राला विकसित करण्याच्या दृष्टीने नविन निर्माण झालेल्या तलावामध्ये मत्स्यबीज संचयन करणे, पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करणे, मत्स्यखाद्य निर्मिती कारखाना, मत्स्यबीज उत्पादन, मत्स्यबोटुकली संवर्धन, तळी बांधणे, बर्फ कारखाना अशा विविध योजना राबविल्या जातात. परंतू मत्स्यव्यवसाय क्षेत्रात काही वेळा हवामानात बदल, नैसर्गिक संसाधनांचे अतिशोषण, अवर्षण, अतिवृष्टी, मासेमारी पध्दती इ. बाबीमुळे पर्यावरण व मत्स्यव्यवसायावर विपरीत परिणाम होतात व त्यामुळे मत्स्यउत्पादन कमी होणे, मच्छिमारांचे उदरनिर्वाहाचे प्रश्न निर्माण होणे अशा प्रकारची आव्हाने निर्माण होतात, याबाबत उपाययोजना सुचवून आयुक्तस्तरीय समितीस शिफारस करण्यासाठी जिल्हाधिकार्यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार आहे.

समितीमध्ये अध्यक्ष:- जिल्हाधिकारी सदस्य:- पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता (संबंधित पाटबंधारे विभाग) जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक निबंधक (दुग्ध), सहकारी संस्था, जिल्हा मच्छिमार संघाचे एकूण ५ प्रतिनिधी.

विशेष निमंत्रित:- मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती/संस्था (शासकीय/अशासकीय)

सदस्य सचिव:- सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यापैकी जिल्हा मच्छिमार संघाचे प्रतिनिधी व विशेष निमंत्रितांची निवड मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्तांनी समितीच्या अध्यक्षांच्या म्हणजेच जिल्हाधिकार्यांच्या मान्यतेने करण्याच्या सूचना या शासन निर्णयाद्वारे देण्यात आल्या आहेत. या समितीने भूजल/निमखारे मत्स्यव्यवसायाशी संबंधित समस्या/अडीअडचणींबाबत विचारमंथन करून उपाययोजना सुचवून आयुक्तस्तरीय समितीस शिफारस करणे अपेक्षित आहे, असेही शासनाने सूचित केले आहे.

# दिवाळीची लगबग संपताच अखेर भात कापणी व झोडणीच्या कामास प्रारंभ

**दै.रायगड नगरी । रोहा**

दिवाळी सणाची लगबग संपताच क्षणाचीही उसंत न घेता अखेर भात कापणी व झोडणीच्या कामास शेतकरी वर्गाने प्रारंभ केला असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

परतीच्या पावसाने कधी नव्हे एवढे नुकसान या वर्षीच्या पावसाळी हंगामात भातशेतीचे झाल्याने शेतकरी वर्ग पुरता कोलमडला होता.

भातशेती कापणी लायक तयार झाली असतानाच परतीच्या पावसाने धुमाकूळ घातल्याने भातशेतीत पाणी तुंबून राहिले होते, तसेच काही ठिकाणी भाताची तयार रोपं ही कलौडलेली होती. अशाप्रकारे भातशेतीचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग हताश झाला होता. त्यातच तोंडावर आलेला दिवाळी सण कसा साजरा करायचा ही परिस्थिती निर्माण झाली होती. अखेर आहे त्या परिस्थितीत दिवाळी सणाचा उत्सव साजरा करून व पुन्हा नव्या जोमाने आहे ते पदरात पाडून घेण्यासाठी शेतकरी वर्ग सज्ज झाला असून सध्या सर्वत्र भातशेती कापणी व झोडणीची



कामे वेगाने सुरू झाली आहेत.

या वर्षी भातशेतीसाठी समाधानकारक पाऊस पडल्यामुळे यंदा रायगड जिल्ह्यात भातशेतीचे पिकही दमदार आले आहे. मात्र मागील काही दिवस पडत असलेल्या जोरदार परतीच्या पावसामुळे भात कापणी लांबणीवर पडली होती. काही ठिकाणी भातशेती आडवी झाल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याच्या भितीने शेतकरी चिंतेत झाले आहेत. या वर्षी अतिवृष्टी न झाल्याने पुरामुळे होणारे नुकसान टळले. त्याचा परिणाम पीक दमदार आल्याने शेतकरीवर्ग खुशीत आहे. दसरा सणाच्या समाप्तीनंतर भातशेती कापणी बांधणीचे कामास प्रारंभ होतो. पण मागील काही दिवस जिल्ह्याच्या सर्वच भागांत कमी-अधिक प्रमाणात पाऊस बरसत होता, त्यामुळे येथील पिकांचे नुकसान झाले आहे. परंतु आता मात्र पावसाने विश्रांती घेतली असल्याने शेतकरी वर्गाने आपल्या शेतातून भात कापणी करण्यास सुरुवात केली आहे.

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या म्हसळा शाखेतर्फे ट्रॅक्टरसाठी कर्ज वितरण

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील मौजे खारगाव खुर्द येथील प्रगतशील शेतकरी पांडूरंग सुदाम मेंदडकर यांना रायगड जिल्हा मध्य .सह. बँकेच्या म्हसळा शाखेतर्फे ट्रॅक्टर साठी बँकेचे विभागीय अधिकारी संजीव देशमुख यांचे हस्ते लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर कर्ज वितरण करण्यात आले. बँकेचे सन्माननिय चेअरमन आमदार भाई जयंत पाटील साहेब यांचे सक्षम नेतृत्वाखाली जिल्हा मध्यवर्ती बँकेने नेहमीच शेती विकासाला प्राधान्य देत शुन्य टक्के व्याजदराने देशामध्ये प्रथमच अल्पमुदत पिककर्जाचे वाटप करणारी पहिली बँक ठरली आहे. शेतकरी बांधवांची जिव्हाळ्याची बँक म्हणून प्राधान्य देताना मध्यम व दिर्घ मुदती साठी शेतीविकसन कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे . याबरोबरच घरबांधणी साठी रु ६० लाखाचे मर्यादे पर्यंत कर्ज देताना ग्रामिण विकासाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे . तसेच लघुउद्योगाला प्राधान्य देताना स्वरोजगार कर्जाचे वितरण शाखा पातळीवर करण्यात येत आहे . याच बरोबर घर दुरुस्ती कर्ज , शैक्षणीक कर्ज, बचतगटांसाठी कर्ज , वाहनतारण कर्ज् , मध्यम मुदत शेती कर्ज, व्यक्तिगत थेट कर्ज,सोनेतारण कर्ज,कॅश् क्रेडिट कर्ज ,पगारतारण कर्ज ,पगारतारण कॅश क्रेडिट कर्ज,पेन्शनतारण कर्ज ,आदी विविध प्रकारच्या कर्जाचे वितरण बँकेतर्फे करण्यात येते, नुकतेच देशातील सहकार क्षेत्रातील सर्वोत्तम बँक म्हणून इंदोर येथे माजी केन्द्रिय मंत्री श्री.सुरेश प्रभू यांचे हस्ते बँकेला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.राज्य शासनाचे सहकार क्षेत्रातील आता पर्यन्तचे सर्वच पुरस्कार बँकेला मिळाले आहेत. त्याचबरोबर या वर्षी तीन प्रकारामध्ये राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत.

मा.दि.न्या.श्री.मुजावर साहेब ह्यांचे न्यायालयात
वारसाचे सर्टीफिकेट बद्दल जाहीर नोटीस — दिवाणी अ १५० रा.
Civ. A 150 m
**अॅड.केशवन रवींद्रन**
**प्रोसेस जमा रु.५०/-** — **अर्जदार यांचे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल
चौकशी अर्ज क्र.१४९१/२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/११/२०२२

१) श्रीमती.प्रतिभा संतोष चंदनशिवे
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : सर्व्हिस
२) कुमार.उत्कर्ष संतोष चंदनशिवे
वय : १५ वर्षे, अल्पवयीन
रा.सदनिका क्र.ए ३०३, सुरज पार्क,
विठ्ठल मंदिराजवळ, प्लॉट नं.२८,
सेक्टर ९, कामोठे, नवी मुंबई ४१०२१८ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार १) श्रीमती.प्रतिभा संतोष चंदनशिवे यांचे पती, २) कुमार.उत्कर्ष संतोष चंदनशिवे, अल्पवयीन ह्याचे वडील कै.संतोष उत्तम चंदनशिवे यांचे दि.१०/०४/२०२१ रोजी नवी मुंबई येथे निधन झाले. यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

**१) सदनिका क्र.ए ३०३, सुरज पार्क, विठ्ठल मंदिराजवळ, प्लॉट नं.२८, सेक्टर ९, कामोठे, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२१८**

**२) सदनिका क्र.जी ७०३, सातवा मजला, शितल धारा सी एच एस लिमिटेड, प्लॉट नं.२८, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२० माहे १० सन २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# सुरगडावरील स्वच्छता स्थानिक सुरगड संवर्धन ग्रुपचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

छत्रपती शिवरायांना प्राणप्रिय अशा गडकोटांच संवर्धन करण्यासाठी रोहा तालुक्यातील तसेच कोलाड खांब देवकान्हे विभागातील शिवप्रेमी तथा स्थानिक सुरगड संवर्धन ग्रुपच्या वतीने सुरगड (घेरासुर गड) या किल्लूयाचे संरक्षण आणि संवर्धन तसेच यावरील स्वच्छता असा दिवाळी शुभमुहूर्तावर येथील शिलेदारांनी स्वच्छता करत एक आगळा वेगळा उपक्रम राबविले आहे.

कोलाड खांब रहाळपरिसरात असलेल्या खांब पंचक्रोशीतील (वैजनाथ) गावच्या माथ्यावरील घेरासुर गाव किल्ले सुरगडाची पहिली वहिली गड संवर्धन मोहीम व दिवाळीच्या शुभमुहूर्तावर दिवाळीच्या सुट्टीचा व आनंदाचा दिवस न पाहता व मौज मजा न करता सर्वांनी एकत्रित येऊन स्थानिक सुरगड संवर्धन ग्रुप करून तसेच शिवप्रेमी पर्यावरण प्रेमी असे एकत्रित या मोहीमेत सहभाग घेऊन या गडाचे संरक्षण व स्वच्छता करण्यात आली.

यावर्षी अति प्रमाणात पाऊस झाला त्यामुळे गडावर जाणाऱ्या मार्गावर व गड परिसरात झाडे झुडपे तसेच दगड गोटे भयानक पडले होते तसेच मार्गाच्या दुतर्फा बाजूला भयानक वाढलेली काटेरी झुडपे व गवत याची स्वछता तर काही पायऱ्यांचे व काही ठिकाणचे दगड चिऱ्यांचे संवर्धन या शिलेदारांनी करत सफाईसाठी नेलेल्या अवजारांची व सुरगडावरील वसलेल्या देवीचे पूजन करण्यात आले. सदरची मोहिम सुरगड संवर्धन ग्रुपच्या वतीने ही पहिल्यांदाच



राबविण्यात आली होती त्यामुळे नाविन्यपूर्ण उपक्रम असल्याने छत्रपती शिवरायांचे मावळे म्हणून अजय भोसले, निलेश निळेकर, मंदार पारठे, अस्मित महाडिक, किशोर सावरकर, विवेक तांडेल, स्वप्नील कापसे, मिलिंद पारठे, प्रतिक पाशिलकर, अलंकार देशमुख, सिद्धेश शेलार, महेंद्र पारठे, पर्ण निळेकर, केतन शिंदे, स्वराज मोहिते, पंकज सावरकर, विनायक चीतळकर, सुरज भिसे निलेश जाधव, मोहीमेत येणाऱ्या प्रत्येकाने आपआपली सुरक्षा साधनं सोबत ठेवली त्यात (बुट, मास्क, हॅण्डग्लोज) पाणी बॉटल, सुका खाऊ व शिजोरी तर शिलेदारांनी कोणी कोयता, फावडा, टिकाऊ, पहार, घमेला हाती घेऊन जाऊन गडकोट संवर्धन मोहिमेतून पूर्ण दिवस सुरगडाची स्वच्छता करत सोबत एकमेकांनी नेलेल्या दिवाळीचा फराळ व शिजोरीचा स्वाद घेत या गडावरील स्वच्छता मोहीम यशस्वी केली.

आपल्या बापजाद्यांनी ज्या गडकोटांसाठी आपलं रक्त सांडवलं त्याच रक्ताची आण म्हणून आपल्या पुढच्या पिढीला सुद्धा आपल्या या बापजाद्यांच्या बलिदानाची जाण रहावी यासाठी हे त्यांची आठवण म्हणून गडकोट सुरक्षित राहीले पाहीजे हिच संकल्पना मनात ठेवून आपण आपल्या या घेरा-सुरगडांच संवर्धन हाती घेत दिवाळीचा आनंदाचा दिवस मौज मजा फटकेबाजीत न घालवता शिवरायांची विचार धारा मनात घेत एक संकल्पना म्हणून या परिसरातील आम्ही सारे मित्रगण एकत्रित येऊन सुरगड व गडकोट संवर्धन ग्रुपच्या माध्यमातून या गडाची स्वछता व संवर्धन करण्याचा आनंद लुटत ही पहिली वहिली मोहीम यशस्वी करण्यात आल्याचे शिवप्रेमी मंदार पारटे यांनी सांगितले

## धावत्या एक्स्प्रेसमधून महिलेच्या पर्सची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मंगळूरू येथून मत्स्यगंधा एक्स्प्रेसने मुंबईत येणाऱ्या ६४ वर्षीय महिलेची रोख रक्कम, मोबाइल फोन असलेली पर्स अज्ञात लुटारूने धावत्या एक्स्प्रेसमधून खेचून पलायन केल्याची घटना पनवेल रेल्वे स्थानकाजवळ घडली. रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कोपरखैरणे गावात राहणाऱ्या मेर्टालडा नडोना (६४) मंगळुरू येथून मत्स्यगंधा एक्स्प्रेसने येत होत्या. सदर एक्स्प्रेस पनवेल रेल्वे स्थानकाजवळ आली असताना, नडोना कुटुंबीय उतरण्यासाठी सामान घेऊन दरवाजात उभे होते. यावेळी गाडीचा वेग कमी झाल्याने एका चोराने दरवाजात उतरण्यासाठी उभ्या असलेल्या मेटलिडा नडोना यांच्या खांद्याला अडकवलेली पर्स खेचून पलायन केले.

